

पतौडी - शर्मिला


मोहसीन - रीना

क्लीन बोल्ड

प्रेमाच्या सामन्यात कोणी कोणाला बाद केलं हा खरंच कोड्यात टाकणारा प्रश्न असतो. कारण इथे जिंकणारा जिंकतोच पण हरणाराही जिंकून जातो. अशा या आगळ्यावेगळ्या खेळाची अजब कथा...

□ इसाक मुजावर


अंजू महेंद्र - गॅरी सोबर्स

देव आनंद व माला सिन्हा या जोडीची भूमिका असलेला सुबोध मुखर्जींचा १९५९ चा *लव्ह मॅरेज* हा चित्रपट आजही अनेकांना आठवत असेल. आज अनेक चित्रपटांत आपण क्रिकेटचा खेळ पाहतो. हा क्रिकेटचा खेळ हिंदी चित्रपटात सर्वात प्रथम आला तो *लव्ह मॅरेज* या चित्रपटात. देव आनंदची या चित्रपटातील भूमिका कॉलेजमधील क्रिकेटपटूची होती. क्रिकेटच्या मैदानातील त्याची फटकेबाजी पाहून चित्रपटाची नायिका माला सिन्हा एकदम क्लीन बोल्ड होते आणि कळत नकळत त्याच्याकडे आकर्षित होऊन त्याच्या प्रेमात पडते.

*लव्ह मॅरेज*मधील नायिकेला नायकाची फटकेबाजी पाहून त्याच्याविषयी वाटणारं आकर्षण फिल्मी होतं. पण वास्तव जीवनात मात्र हे आकर्षण फिल्मी नसतं. कळत नकळत अनेक तरुणींच्या आयुष्यातील सत्य बनून ते त्यांना क्लीन बोल्ड करतं. अनेक तरुण ज्यांच्यावर जीव टाकत असतात अशा लोकप्रिय चित्रतारकादेखील याला अपवाद नसतात. क्रिकेटच्या मैदानावरील क्रिकेटपटूंची फटकेबाजी पाहून अनेकदा त्या क्लीन बोल्ड होतात. नावंच सांगायची झाली तर शर्मिला टागोर, रीना रॉय, संगीता बिजलानी यासारख्या कितीतरी चित्रतारकांची नावं सांगता येतील. क्रिकेटच्या मैदानावरील क्रिकेटपटूंच्या फलंदाजीने या साऱ्या चित्रतारकांना एकदम क्लीन बोल्ड करून टाकलं आहे. पण क्लीन बोल्डचा हा खेळ चित्रपटात केव्हा सुरू झाला? आणि कोणती चित्रतारका या खेळात सर्वात प्रथम क्लीन बोल्ड झाली?

माझ्या या प्रश्नाचं उत्तर देताना सर्वजण कोरसमध्ये एकच नाव घेतील शर्मिला टागोरच. कारण क्रिकेटपटू पतोडीबरोबर झालेला तिचा विवाह चांगलाच गाजला होता. त्या दोघांचा विवाह एक अभिनेत्री व एक क्रिकेटपटू यांच्या विवाहाची सुरुवात करणारा पहिलाच विवाह होता. तरीही एका क्रिकेटपटूचा क्रिकेटच्या मैदानावरील फटकेबाजीचा पराक्रम पाहून क्लीन बोल्ड झालेली पहिली चित्रतारका म्हणून शर्मिला टागोरचं नाव आपल्याला घेता येणार नाही. पहिलं नाव आपल्याला घ्यावं लागेल ते बेगमपाराचं. आजच्या पिढीला हे नाव ओळखीचं

वाटणार नाही. कारण १९५७ च्या *आदमी* या चित्रपटानंतर ती पडद्याआड गेलेली असल्यामुळे त्यानंतर उदयास आलेल्या प्रेक्षकांच्या पिढीला ती माहीत असणं शक्यच नाही. पण १९९७ च्या *मृत्युदातात* माधुरी दीक्षितबरोबर नायकाची भूमिका करणारा अभिनेता अयूब खान मात्र आजच्या पिढीतील अनेक प्रेक्षकांना माहीत आहे. बेगमपारा या अयूब खानची आई. ती चाळीसच्या दशकातील आपल्या चित्रपटातील एक बोल्ड चित्रतारका होती. क्रिकेट हा तिचा आवडता खेळ होता. पण तो तिने फक्त पाहण्यापुरताच मर्यादित ठेवला नव्हता. शालेय जीवनात ती मैदानात उतरून क्रिकेट खेळायची. चित्रपटात आल्यावर याचा तिला फायदा झाला. चित्रपट कलावंतांनी एक चॅरिटी शो म्हणून आयोजित केलेल्या एका क्रिकेट मॅचमध्ये तिने भाग घेतला होता. तिच्याबरोबर अनेक अभिनेते या क्रिकेट मॅचमध्ये होते. पण शालेय जीवनापासून क्रिकेट खेळण्याची तिला आवड असल्यामुळे ती फटकेबाजीत या मॅचमध्ये भाग घेणाऱ्या अभिनेत्यांनादेखील भारी पडली मॅचमध्ये भाग घेतलेल्या एकजात साऱ्या कलावंतांहून अधिक धावा काढून. क्रिकेटच्या या वेडामुळेच भारतात कोठेही क्रिकेट मॅच असेल तर ती पाहायला ती आवर्जून जायची. मॅच पाहता पाहता त्या काळात ती वेस्ट इंडिजचा एक क्रिकेट खेळाडू फ्रॅंक वॉरेल यांच्याकडे आकर्षित झाली होती. तोही तिच्याकडे आकर्षित झाला होता. तरीही त्या दोघांचा विवाह काही झाला नाही. दिलीपकुमारचा भाऊ अभिनेता नासिर खान याच्याशी विवाह करून ती पडद्याआड गेली.

फ्रॅंक वॉरेल व बेगमपारा याच्यानंतर एक क्रिकेटपटू व एक अभिनेत्री यांची अनेक प्रेमप्रकरणं चित्रपट व्यवसायात रंगली. त्यातलं एक प्रेमप्रकरण म्हणजे गॅरी सोबर्स व अंजू महेंद्रू यांचं प्रेमप्रकरण. अंजू महेंद्रू चित्रपट व्यवसायात आली तेव्हा राजेश खन्नाची प्रेयसी ही तिची ओळख होती. राजेश खन्ना आयएनटीच्या नाटकात भूमिका करायचा. अंजू महेंद्रूही तेव्हा त्याच्याबरोबर आयएनटीत होती. त्या दोघांचं प्रेमप्रकरण तेव्हाच सुरू झालं होतं. पण नंतर वेस्ट इंडीजचा एक क्रिकेटपटू गॅरी सोबर्सची क्रिकेटच्या मैदानावरील फटकेबाजी पाहता पाहता ती त्याच्याकडे आकर्षित झाली. फ्रॅंक वॉरेल व बेगमपारा यांच्या प्रेमप्रकरणाची बरीच चर्चा झाली होती. पण गॅरी सोबर्स व अंजू महेंद्रू यांचं प्रेमप्रकरण फक्त चर्चेपुरतंच मर्यादित राहिलं नाही. त्यांच्या प्रेमप्रकरणाने साखरपुड्यापर्यंत मजल मारली. या साखरपुड्याची बातमी सर्व वृत्तपत्रातून फ्लॅश झाली आणि अंजू महेंद्रू चित्रपटातील तिच्या भूमिकांहून या साखरपुड्यामुळेच एकदम फ्लॅशमध्ये आली. चित्रपटात मिळाली नसेल अशी प्रसिद्धी गॅरी सोबर्सबरोबरच्या प्रेमप्रकरणामुळे तिला मिळाली. पण साखरपुडा होऊनही त्या दोघांच्या प्रेमप्रकरणाची परिणती काही विवाहात झाली नाही.

क्रिकेटपटू व अभिनेत्री यांच्या प्रेमप्रकरणाला विवाहापर्यंत पोहचवणारा पहिला विवाह म्हणजे पतौडी व शर्मिला टागोर यांचा विवाह. त्या दोघांची ओळख झाली ती तनुजामुळे. तनुजा पतौडीची सुरुवातीच्या काळातील मैत्रीण. शर्मिलाही तेव्हा तनुजाची मैत्रीण होती आणि तेव्हा ती पतौडीची जबरदस्त चाहती होती. पण पतौडीशी तिची ओळख नव्हती. तनुजाला हे कळलं तेव्हा तिने त्या दोघांची ओळख करून दिली. या ओळखीनंतर तनुजाला मागे टाकून शर्मिला पुढे गेली आणि पतौडीची पत्नी बनली. काय गंमत आहे पाहा, पतौडी व तनुजा यांची मैत्री संपुष्टात आली. कालांतराने पतौडी-शर्मिला यांचा मुलगा सैफअली चित्रपटात नायक बनला आणि तनुजाची मुलगी काजोल *हमेशा* या चित्रपटात त्याची नायिका बनली. सैफअलीला चित्रपटात भूमिका करता करता अमृता सिंह भेटली आणि ती त्याची पत्नी बनली. अमृता सिंह चित्रपटात आली तेव्हा एका क्रिकेटपटूच्या प्रेमात पडली होती. हा क्रिकेटपटू म्हणजे रवी शास्त्री. त्याच्याशी लग्न करून एका क्रिकेटपटूची पत्नी बनण्याचं स्वप्न ती पाहात होती. तिचं हे स्वप्न काही साकार झालं नाही तरीही सैफअलीशी लग्न करून ती एका क्रिकेटपटूच्या घरची सून बनली.

पतौडी-शर्मिलानंतर क्रिकेटपटू व अभिनेत्री यांचा आणखी एक विवाह आपल्या चित्रपट व्यवसायात झाला, मोहसीन खान व रिना रॉय यांचा. पण पतौडी व शर्मिला यांच्याप्रमाणे त्या दोघांचा विवाह काही सुखाचा ठरला नाही. या विवाहाची परिणती घटस्फोटात झाली. शर्मिलाशी विवाह केल्यावर पतौडीने अभिनेता बनण्याचा सोस कधी धरला नाही. पण मोहसीन खान मात्र रिना रॉयशी विवाह केल्यावर तोंडाला रंग लावून चित्रपटात आला. *बटवारा, साथी, प्रतिकार*सारख्या काही चित्रपटात त्याने भूमिका केल्या. मोहसीन खानपूर्वीही काही क्रिकेटपटूंनी चित्रपटात भूमिका केल्या. या क्रिकेटपटूतला एक क्रिकेटपटू म्हणजे संदीप पाटील. *कभी अजनबी थे* या चित्रपटात तो नायक होता आणि या चित्रपटाच्या चित्रणाच्या वेळी या चित्रपटातली एक अभिनेत्री देबाश्री रॉय हिच्याशी त्याचे सूत जमले होते. संदीप पाटीलप्रमाणे अझरुद्दीनने कधी चित्रपटात भूमिका केली नाही. तरीही क्रिकेटच्या मैदानावरील त्याची फटकेबाजी पाहून मिस इंडिया अभिनेत्री


नासीर खान - बेगम पारा


नीना - विवियन



रवी - अमृता



अझर - संगीता

संगीता बिजलानी क्लीन बोल्ड झाली आणि सलमान खानशी तिचे सूत जमलेले असतानाही त्याला क्लीन बोल्ड करून ती अझरुद्दीनची पत्नी बनली.

झीनत अमानही तिच्या रुपेरी जीवनाच्या सुरुवातीच्या काळात एका क्रिकेटपटूमागे वेडी झाली होती. हा क्रिकेटपटू म्हणजे पाकिस्तानच्या क्रिकेट संघाचा कर्णधार इम्रान खान. त्या दोघांचं प्रेमप्रकरण जेव्हा जोरात होतं तेव्हा अनेक निर्मात्यांच्यावर क्लीन बोल्ड व्हायची पाळी यायची. अनेक चित्रपटांच्या चित्रणासाठी झीनतने तारखा दिलेल्या असल्या तरी इम्रानच्या मागे धावता धावता या तारखांचं तिला भान राहायचं नाही. शूटिंगसाठी दिलेल्या तारखा न पाळता ती इम्रानला भेटायला जायची. यामुळे तिची भूमिका असलेल्या चित्रपटाच्या चित्रणाचा सारा कार्यक्रम त्या काळात एकदम अपसेट होऊन जायचा.

क्रिकेटपटू व अभिनेत्री यांची अनेक प्रेमप्रकरणं चित्रपट व्यवसायात झाली. या प्रेमप्रकरणातलं सर्वात बोल्ड प्रेमप्रकरण म्हणजे व्हिव्हियन रिचर्डस्‌ व नीना गुप्ता यांचं. त्या दोघांच्या प्रेमाची परिणती विवाहात झाली नाही तरीही एका मुलीला त्या दोघांनी जन्म दिला. या मुलीचं नाव मसाका. कौमार्यावस्थेतील मातृत्वाला आपल्या समाजात अद्यापि मान्यता मिळालेली नाही, तरीही नीनाने समाजाची पर्वा न करता हे मातृत्व स्वीकारलं आणि व्हिव्हियन रिचर्डसच्या मुलीला जन्म दिला.

क्रिकेटच्या मैदानात धावा काढण्यासाठी धावत असताना क्रिकेटपटू अनेकदा पडतात. या पडण्यात त्यांचा पाय दुखावला जातो, पण तो मोडत मात्र नाही, पण नटीबरोबरच्या प्रेमप्रकरणात मात्र अनेकदा क्रिकेटपटूंना आपला पाय गमवावा लागतो. पाकिस्तानचा क्रिकेटपटू नजर महमूद याला गायिका-अभिनेत्री नूरजहाबरोबरच्या प्रेमप्रकरणात आपला पाय असाच गमवावा लागला होता. नूरजहा विवाहित आहे, हे माहीत असूनदेखील नजर तिच्या पतीच्या नकळत तिच्यावर प्रेम करत होता. या चोरट्या प्रेमप्रकरणात तिच्या नवऱ्याकडून तो एकदा रंगेहाथ पकडला गेला. तेव्हा खिडकीतून उडी मारून पळण्याचा प्रयत्न त्याने केला. या प्रयत्नात त्याचा पायच मोडल्यामुळे क्रिकेटच्या मैदानातून तो कायमचा क्लीन बोल्ड झाला. क्रिकेटपटूवर प्रेम करणाऱ्या अनेक चित्रतारका आपल्या चित्रपटात होऊन गेल्या. पण एका क्रिकेटपटूबरोबर आपल्या रुपेरी जीवनाची सुरुवात करणारी एकच चित्रतारका आपल्या चित्रपटात होऊन गेली. ती चित्रतारका म्हणजे परवीन बाबी. १९७३ चा बी. आर. इशारांचा *चरित्र* हा तिची भूमिका असलेला पहिला चित्रपट. या चित्रपटात क्रिकेटपटू सलिम दुराणी तिचा नायक होता. तो चित्रपटात येणारा पहिलाच क्रिकेटपटू. *चरित्र* अजिबात चालला नाही, तरीही परवीन बाबी चित्रपटात यशस्वी झाली. सलिम दुराणी मात्र एकाच चित्रपटात चित्रपटातून बाद झाला. ✰

(मुखपृष्ठकथा... पान नं. ८वरून)

आणि क्रिकेटर्स यांच्यातील सामन्याची जोरदार चर्चा झाली होती.

'सेव द चिल्ड्रन'साठी 'हीरोज् ऑफ द टॉप' कार्यक्रमातून मुंबई क्रिकेट क्लब ऑफ इंडियानेदेखील चित्रपट कलाकार आणि क्रिकेटपटूंच्या दरम्यान एका सामन्याचं आयोजन केलं होतं. त्यात अमिताभ, जॅकी, रविना, युक्ता मुखी, अक्षयकुमार, ऐश्वर्या राय वगैरे फिल्मी कलाकारांनी



*चरित्र*मध्ये परवीनसह सलीम दुरानी



*कभी अजनबी थे*मध्ये पूनम - संदीप पाटील

स्टीव्ह वॉ, राहुल द्रविड, सचिन तेंडुलकर, शेन वॉर्न, ग्लेन मॅकग्राथ, ॲडम गिलक्रिस्ट, मायकल स्लेटर वगैरे क्रिकेटपटूंना भरमैदानात आव्हान दिलं. या सामन्यातून लाखो रुपयांचा निधी उभाण्यात आला.

चित्रपट संगीतावरही क्रिकेटचा पगडा असल्याचं लक्षात येतं. विश्वचषकाच्या निमित्ताने महेश मांजरेकरच्या दिग्दर्शनात *हमको तो है पूरा यकीन* नावाच्या अल्बममध्ये सुनील शेट्टी, संजय दत्त, बिपाशा बसू, रविना टंडन, महिमा, दिया मिर्झा, सलमान, जॉन अब्राहमसारखे कलाकार दिसतात. तर अदनान सामीच्या *ओ ए ओ*मध्ये अमिताभ बच्चन, फरदीन खान, करिना कपूर, अभिषेक, सौरव, हरभजन सिंग, राहुल द्रविड आणि झहीरसारखी दोन्ही क्षेत्रांतील आघाडीची मंडळी पाहायला मिळतात.

थोडक्यात, ग्लॅमरच्या दुनियेतील ही दोन आघाडीची क्षेत्रं तशी एकमेकांपासून फार भिन्न असली तरीही परस्परांना नेहमीच पूरक राहिली आहेत आणि भविष्यातही राहतील. ✰